॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

**✲ सुविचार ✲**
कोणतेही स्वप्न जादूने सत्यात उतरत नाही, त्यासाठी घाम गाळावा लागतो, कठोर परिश्रम करावे लागतात.

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ४२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### कचरा डेपो

डोंगर पोखरून उंदीर
आतमध्ये काढलेला
प्रक्रियेविना उभा आहे
कच-याचा ढिग वाढलेला
स्वच्छ भारत हे तर
नावापुरतेच मिशन आहे
ढासळलेल्या ढिगापेक्षा
गाडलेले भिषण आहे

## SPOT NEWS

### इस्रायलचा गाझावर पुन्हा हल्ला

● **नवी दिल्ली** – इस्रायलने मध्य गाझामधील दीर अल बलाह या निवासी भागातील एका इमारतीवर मोठा हल्ला केला आहे. इस्रायली हल्ल्यात ३ पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला असून अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. गाझामधील वैद्यकीय सूत्रांनुसार, या हल्ल्यात ती इमारत पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून आजूबाजूच्या परिसराचेही मोठे नुकसान झाले आहे. नागरिकांना लक्ष्य करून त्यांचे मनोधैर्य खच्ची करण्यासाठीच इस्रायलने हा हल्ला केल्याचा आरोप रुग्णालयातील सूत्रांनी केला आहे. दुसरीकडे, मंगळवारी झालेल्या इस्रायली हल्ल्यांमध्ये १० पॅलेस्टिनी नागरिक मारले गेले. ऑक्टोबरमध्ये इस्रायल आणि हमास यांच्यात युद्धविराम लागू झाल्यापासून आतापर्यंत १ हजार १०० हून अधिक पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला आहे. हा ताजा हल्ला अशा वेळी झाला आहे.

### देशात चांदीपुरा व्हायरसची दहशत

● **नवी दिल्ली** – महाराष्ट्राच्या शेजारील गुजरातमध्ये चांदीपुरा व्हायरसमुळे पुन्हा चिंता वाढली आहे. गेल्या काही आठवड्यांत या विषाणूमुळे तीन लहान मुलांचा मृत्यू झाला असून चार मुलांवर उपचार सुरू आहेत. याशिवाय आठ संशयित रुग्णांचे अहवाल अद्याप आलेले नाहीत. सर्व रुग्ण १० वर्षांखालील असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दरम्यान, आरोग्य विभागाने नागरिकांना घाबरून न जाता सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, संशयास्पद लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात संपर्क साधण्यास सांगितले आहे.

# मान्सून जागीच थांबला

## हवामान विभागाची माहिती । पश्चिम भारतात मुसळधार

● **नवी दिल्ली । वीरभूमी –**
देशभरात मान्सूनची स्थिती एकसारखी नाही. राजस्थान, मध्य प्रदेश, दिल्ली, हरियाणा आणि पंजाब या राज्यांमध्ये मान्सूनची प्रगती जागीच थांबली आहे; तर दुसरीकडे बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल आणि पूर्व उत्तर प्रदेशातील अनेक भागांत मुसळधार पाऊस पडत आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मान्सूनचा पट्टा (ट्रफ) आणि अरबी समुद्र व बंगालच्या उपसागरावरून येणारे आर्द्रतायुक्त वारे पूर्व भारतावरच स्थिरावले आहेत. परिणामी, देशाच्या पश्चिम आणि उत्तर भागांपर्यंत पुरेसे बाष्प पोहोचत नसल्याने तिथे पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. हवामान विभागाच्या मते, कमी दाबाचे नवीन क्षेत्र तयार झाल्यास किंवा मान्सूनचा पट्टा पश्चिमेकडे सरकल्यास, काही दिवसांनंतर या राज्यांमध्येही चांगला पाऊस सुरू होऊ शकतो. अरुणाचल प्रदेशात गेल्या २४ तासांत पूर, दरडी कोसळणे आणि मुसळधार पावसामुळे चार जिल्ह्यांचे नुकसान झाले आहे. राज्यातील १.०२ लाखांहून अधिक लोकांना फटका बसला आहे. आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला असून, २९ जण जखमी झाले आहेत.



दरम्यान, आसाममधील सहा जिल्ह्यांतील ९९ गावे पुराच्या विळख्यात सापडली आहेत. तेथील ३७,०३२ लोक बाधित झाले आहेत. लखीमपूर जिल्ह्याला सर्वाधिक फटका बसला आहे.

हवामान विभागाने रथयात्रेवेळी पुरीसह ओडिशामधील अनेक भागांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा तयार होत असल्यामुळे हा इशारा देण्यात आला आहे. पुढील २४ तासांत बंगालचा उपसागर आणि पश्चिम बांगलादेशच्या लगतच्या किनारपट्टीवर कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. हवामानातील या बदलामुळे, बुधवारपासून ते शुक्रवार सकाळपर्यंत पुरीमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# बोगस पीक विमा काढल्यास पाच वर्षे होणार ‘ब्लॅकलिस्ट’

● **मुंबई । वीरभूमी–**
पंतप्रधान पीकविमा सुधारित योजनेसाठी आता ‘डिजिटल पीक सर्वेक्षण’ बंधनकारक असेल. तसेच, विमा अर्ज भरतानाची नोंद आणि डिजिटल सर्वेक्षणातील पीक यात तफावत आढळल्यास डिजिटल सर्वेक्षणातील नोंदच अंतिम मानली जाईल.

फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला तर अर्जदाराला पीक विम्यासह ‘नमो शेतकरी महासन्मान’ सारख्या कृषी विभागाच्या सर्व योजनांमधून पाच वर्षांसाठी ब्लॅकलिस्ट केले जाणार आहे. पीक विमा अर्ज भरण्यासाठी प्रति अर्ज किमान ०.१० हेक्टर (१० गुंठे) इतकी मर्यादा घालण्यात आली आहे. ई-पीक पाहणी किंवा डिजिटल क्रॉप सर्वेक्षणामधील पीक आणि भरलेल्या अर्जातील पीक/क्षेत्रात तफावत आढळल्यास अर्ज रद्द होतो आणि भरलेला हप्ता जप्त केला जातो. कुळाने किंवा भाडेपट्ट्याने शेती करणा-यांना आता पीक विमा संकेतस्थळावर ‘रजिस्टर्ड भाडेकरार’ अपलोड करावा लागेल.

पाच वर्षांच्या सरासरीपेक्षा जास्त पावसाने शेतक-यांचे मोठे नुकसान झाले तरीही विम्याच्या निकषात जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी अपात्र ठरले. त्यामुळे त्यांना भरपाईपासून वंचित राहावे लागले. त्यामुळे जुने पाच निकष पुन्हा लावण्याची मागणी होत आहे. विमा हप्ता म्हणून शेतकयांना केवळ दोन टक्के, रब्बी पिकांसाठी दीड टक्का, तर नगदी पिकांसाठी पाच टक्के हिस्सा भरावा लागणार आहे. उर्वरित विमा प्रीमियम शासनाकडून भरला जाणार आहे. विमा घेतलेले पीक व डिजिटल पीक सर्वेक्षण नोंदविलेले पीक यात तफावतीचा मुद्दा उद्भवल्यास डिजिटल पीकविमा सर्वेक्षणात नोंदविलेले पीक अंतिम गृहीत धरण्यात येईल.

बोगस किंवा फसवणुकीच्या उद्देशाने विमा घेतल्याचे आढळल्यास संबंधित शेतकऱ्याला पीकविमा योजनेसह कृषी विभागाच्या विविध डीबीटी योजनांपासून पाच वर्षांसाठी अपात्र ठरविले जाईल.

# चरणसेवेने वारकऱ्यांचा प्रवास झाला सुखकर

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
आषाढी पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांचा पायी प्रवास सुखकर, सुरक्षित आणि आरोग्यदायी व्हावा, या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षामार्फत ‘चरणसेवा’ उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत मातोश्री आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, कोकाटे वस्ती, कर्जुळे हर्या, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांच्या माध्यमातून आणे येथे श्री रंगदास स्वामी पायी दिंडी सोहळ्यात वारकऱ्यांसाठी चरणसेवा, मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले.



या शिबिरामध्ये सुमारे १९० वारकरी सहभागी झाले. त्यापैकी १०६ वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच १०६ वारकऱ्यांना मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. याशिवाय ८० वारकऱ्यांना आयुर्वेदिक औषधी तेलाच्या साहाय्याने चरणसेवा देण्यात आली.

वारकऱ्यांच्या पायांना आयुर्वेदिक औषधी तेलाने मालिश करण्यात आल्यामुळे दीर्घ पायी प्रवासामुळे आलेला ताण व थकवा कमी होण्यास मदत झाली. त्यामुळे पुढील प्रवासासाठी वारकऱ्यांना नवचैतन्य लाभले. यावेळी वारकऱ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमामध्ये मातोश्री आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथील ३० डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वारकऱ्यांना सेवाभावाने आरोग्य तपासणी, औषधोपचार व चरणसेवा उपलब्ध करून देण्यात आली.

या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अहिल्यानगर मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षाचे डॉ. रेहान शाह आणि स्वप्नील कच्छवे यांनी संबंधित संस्थेशी समन्वय साधून नियोजन व आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. संतोष घाणे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# पारनेर तालुक्यात दमदार पावसाची हजेरी; बळीराजा सुखावला



● **पारनेर । वीरभूमी–**
गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या पावसाने बुधवारी पारनेर शहरासह तालुक्यात दमदार हजेरी लावली. दुपारनंतर आकाशात दाटून आलेल्या काळ्या ढगांनी काही वेळातच जोरदार सरी बरसवल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आणि उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

पावसामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून शेतीकामांना वेग येण्याची आशा निर्माण झाली आहे. पेरणीपूर्व मशागतीच्या कामांनाही गती मिळणार आहे. दरम्यान, अचानक झालेल्या पावसामुळे शहरातील काही मुख्य रस्त्यांवर पाणी साचले.

तरीही या पावसामुळे खरिपाच्या हंगामाला चांगली सुरुवात झाल्याची भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त होत असून, शहरात पावसाचा जोर उशिरापर्यंत कायम होता.

# लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत ९० टक्के सेवा वेळेत द्या

## राज्य सेवा हक्क आयुक्त चित्रा कुलकर्णी । जिल्ह्याचे राज्यातील अग्रस्थान कायम राखण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत नागरिकांना विहित कालमर्यादेत सेवा उपलब्ध करून देणे ही केवळ महसूल विभागाची नव्हे, तर सर्व विभागांची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक विभागाने किमान ९० टक्के अर्ज निर्धारित कालमर्यादेत निकाली काढून नागरिकांना वेळेत सेवा उपलब्ध करून द्यावी. गेल्या चार वर्षांत अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे जिल्ह्यातील सेवा वितरण व्यवस्थेत लक्षणीय सकारात्मक बदल झाला असून अहिल्यानगर जिल्हा राज्यात अग्रस्थानी आहे. हे अग्रस्थान कायम राखण्यासाठी सर्व विभागांनी अधिक समन्वयाने आणि उत्तरदायित्वाने कार्य करावे, असे निर्देश राज्य सेवा हक्क आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल, आयोगाचे उपसचिव धनंजय पुराड-उपाध्ये, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी, आयोगाचे सहायक कक्ष अधिकारी सचिन पोद्दार आदी उपस्थित होते.

राज्य सेवा हक्क आयुक्त चित्रा कुलकर्णी म्हणाल्या की, राज्यस्तरीय क्रमवारीत जिल्ह्याचे स्थान प्रत्येक विभागाच्या कामगिरीवर अवलंबून असते. एखाद्या विभागाची कामगिरी चांगली असूनही इतर विभागांकडून सेवा वितरणात विलंब होत असेल, तर त्याचा परिणाम संपूर्ण जिल्ह्याच्या कामगिरीवर होतो. त्यामुळे प्रत्येक विभागाने आपल्या जबाबदारीचे भान ठेवून नागरिकांना विहित कालमर्यादेत सेवा उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा, असे निर्देश त्यांनी दिले.



मुख्यमंत्री कार्यालयाकडून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत दरमहा विभागनिहाय कामगिरीचा आढावा घेतला जात असून प्रत्येक अधिकाऱ्याने किमान ९० टक्के अर्ज निर्धारित मुदतीत निकाली काढणे अपेक्षित आहे. सातत्याने कमी कामगिरी करणाऱ्या विभागांबाबत संबंधित विभागप्रमुखांना सूचना देण्यात येतील. तसेच आवश्यकतेनुसार त्यांना मुख्यमंत्री कार्यालयात स्पष्टीकरणासाठी उपस्थित राहण्यास सांगितले जाऊ शकते, असेही त्या म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या की, सेवा वितरणातील विलंबाची कारणे अनेकदा संबंधित विभागांच्या अधिसूचनांमध्येच आढळून येतात. सेवा, सक्षम अधिकारी, कालमर्यादा आणि आवश्यक कागदपत्रे संबंधित विभागांनीच निश्चित केलेली असल्याने आवश्यक सुधारणा करण्याचे अधिकारही त्यांच्याकडे आहेत. त्यामुळे नागरिकांना अडथळा ठरणाऱ्या तरतुदींचा आढावा घेऊन आवश्यक सुधारणांचे प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करावेत. केवळ समस्या मांडण्यापेक्षा त्यावर व्यवहार्य उपाय सुचविण्याची जबाबदारी प्रत्येक विभागाने स्वीकारावी. नागरिकांना गुणवत्तापूर्ण आणि वेळेत सेवा उपलब्ध करून देणे, जिल्ह्याचे राज्यातील अग्रस्थान कायम राखणे आणि प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करणे, यासाठी सर्व विभागांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारून प्रभावीपणे काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

आयुक्त चित्रा कुलकर्णी म्हणाल्या की, महानगरपालिकेमार्फत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सर्व सेवा विहित कालमर्यादेत उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक विभागाने अधिक उत्तरदायित्वाने काम करावे. जन्म-मृत्यू दाखले, मालमत्ता कर, बांधकाम परवानग्या, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच इतर नागरी सेवांमध्ये कोणताही अनावश्यक विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी. प्राप्त अर्ज, प्रलंबित प्रकरणे तसेच अपिलांचा नियमित आढावा घेऊन सेवा वितरण अधिक पारदर्शक, गतिमान व नागरिकाभिमुख करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले.

# SPOT NEWS

## जादूटोणाविरोधी जनजागृती समितीसाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज मागविले

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शासनाच्या 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालणे व त्यांचे समूळ उच्चाटन करणे अधिनियम, २०१३' तसेच शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर जादूटोणाविरोधी कायदा जनजागृती, प्रचार व प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती गठित करण्यात येत असून, समितीवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी इच्छुकांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले आहे. समितीवर ७ अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार असून, त्यामध्ये किमान दोन महिला सदस्यांचा समावेश अनिवार्य राहील. समाजसेवक, अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी तसेच संबंधित क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींनी अर्ज करावेत. विहित नमुन्यातील अर्जासोबत उमेदवाराचा स्वपरिचय, अलीकडील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, आधार कार्ड अथवा अन्य ओळखपत्राची प्रत तसेच संबंधित क्षेत्रातील सामाजिक कार्याचा संक्षिप्त अहवाल आणि आवश्यक असल्यास त्यासंबंधीचे पुरावे जोडणे आवश्यक आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून, अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सावेडी नाका, नगर-मनमाड मार्ग, अहिल्यानगर - ४१४००३ या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष किंवा टपालाद्वारे स्वीकारण्यात येतील. ३१ जुलै २०२६ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी २८ जुलैपर्यंत अर्ज करा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर तसेच वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश अभ्यासक्रमांसाठी ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातींतील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी २८ जुलै २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे. मांग, मातंग, मिनी मादीग, मादीग, दानखनी मांग, मांग महाशी, मदारी, राधे मांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी व मादीगा या १२ पोटजातींतील पात्र विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर-मनमाड मार्ग, सावेडी, अहिल्यानगर येथे प्रत्यक्ष किंवा dmlasdcnagargmail.com या ई-मेलद्वारे सादर करावेत. अर्जासोबत जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, गुणपत्रिका, पुढील वर्गात प्रवेश घेतल्याचा पुरावा, प्रवेश नोंदणी पावती अथवा बोनाफाईड प्रमाणपत्र, आधार कार्ड किंवा मतदान ओळखपत्र अथवा रेशनकार्ड तसेच अलीकडील पासपोर्ट आकाराचे एक छायाचित्र जोडणे आवश्यक आहे.

# जात प्रमाणपत्राच्या प्रलंबित प्रकरणांवरून श्रीगोंद्यात उपोषण

### भटक्या विमुक्त व आदिवासी समाजाच्या ५०० अर्जांवर तातडीने निर्णय घेण्याची लोकअधिकार आंदोलन संघटनेची मागणी

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

भटक्या विमुक्त आणि आदिवासी समाजातील नागरिकांच्या प्रलंबित जात प्रमाणपत्र प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी, या मागणीसाठी लोकअधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने बुधवार दि.१५ पासून तहसील कार्यालय, श्रीगोंदा येथे आमरण उपोषण सुरू करण्यात आले.




सन २०२४ मध्ये शासनाच्या विशेष मोहिमेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पद्वारे भटक्या विमुक्त व आदिवासी समाजातील नागरिकांनी जात प्रमाणपत्रासाठी सुमारे ५०० अर्ज तहसील कार्यालयात दाखल केले होते. मात्र दोन वर्षे उलटूनही अनेक प्रकरणे प्रलंबित असून, संबंधित लाभार्थ्यांना अद्याप जात प्रमाणपत्र मिळाले नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती, वसतिगृह सुविधा तसेच विविध शासकीय योजना व सवलतींचा लाभ घेण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

लोकअधिकार आंदोलन संघटनेचे प्रवक्ते बापू ओहोळ, तालुका अध्यक्ष विशाल पवार तसेच सदस्य लता उत्तम शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात येत आहे. यावेळी लता शिंदे, बापू ओहोळ, उमा जाधव, विशाल पवार, पल्लवी शेलार, राजश्री लष्करे, सारिका गोंडे, अशोक मोरे, गणेश तांबवे, राजू शिंदे यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी उपोषणात सहभागी झाले आहेत.

आंदोलनकर्त्यांनी तहसील प्रशासनाकडे मागणी केली आहे की, प्रलंबित जात प्रमाणपत्र अर्जांची तातडीने छाननी करून पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात यावीत. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी या प्रकरणांवर विशेष लक्ष देऊन तत्काळ निर्णय घ्यावा. दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तहसील प्रशासनाकडून या प्रकरणी कोणती भूमिका घेतली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## धनादेश बाऊन्स प्रकरणी कर्जदाराला १४ हजारांचा दंड

### कर्जफेडीसाठी दिलेला ८८ हजारांचा धनादेश वटला नाही

**● शेवगाव । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील सुसरे येथील सुवर्णकमळ मल्टीपल निधी लिमिटेडकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी दिलेला धनादेश बँकेत अनादरित (बाऊन्स) झाल्याप्रकरणी अहमदनगर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने आरोपीस १४ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. दंडाची रक्कम न भरल्यास दोन महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.



या प्रकरणात नासीर सलीम शेख (रा. अमरापूर, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) यांनी सुसरे येथील सुवर्णकमळ मल्टीपल निधी लिमिटेडकडून ६० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्जाची थकबाकी वाढल्यानंतर कंपनीने परतफेडीची मागणी केली. त्यानंतर शेख यांनी ८८ हजार ३४२ रुपयांचा धनादेश दिला.

मात्र, बँकेत सादर केलेला धनादेश अनादरित झाला. कायद्यानुसार नोटीस बजावूनही विहित मुदतीत रक्कम अदा न केल्याने निधी कंपनीने अहमदनगर न्यायालयात तक्रार दाखल केली.

या खटल्याची सुनावणी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी गजानन जी. सोनी यांच्या न्यायालयात झाली. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद व पुरावे विचारात घेऊन न्यायालयाने आरोपीस १४ हजार रुपयांचा दंड, तसेच दंड न भरल्यास दोन महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली.

फिर्यादी सुवर्णकमळ मल्टीपल निधी लिमिटेडतर्फे ॲड. प्रदीपकुमार ए. वावरे यांनी कामकाज पाहिले.

## बाबूजी आव्हाड महाविद्यालयात करिअर संसदेची स्थापना

### ओमकार शिरसाट पुन्हा मुख्यमंत्री । जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त पदाधिकाऱ्यांची शपथ

**● पाथर्डी । वीरभूमी–**

येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी करिअर कट्टा अंतर्गत करिअर संसदेची स्थापना करण्यात आली. जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.




यावेळी ओमकार शिरसाट यांची पुन्हा मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. तसेच दीपा काकडे (नियोजन), विद्या पुंड (कायदे व शिस्तपालन), संचिता वायकर (सामान्य प्रशासन), ऋतुंभरा उबाळे (माहिती व प्रसारण), मयुरी जाधव (उद्योजकता विकास), अनुष्का ढोले (रोजगार व स्वयंरोजगार), गौरव जाधव (कौशल्य विकास), ज्ञानेश्वरी पुंड (संसदीय कामकाज) आणि अनम शेख (महिला व बालकल्याण) यांची विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना पद व कर्तव्याची शपथ दिली.

प्राचार्य डॉ. चौरे म्हणाले, करिअर कट्टा अंतर्गत महाविद्यालयीन करिअर संसदेचे हे दुसरे वर्ष असून विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावरही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. करिअर कट्टा हा विद्यार्थ्यांच्या करिअर विकास, कौशल्य प्रशिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार तसेच यूपीएससी, एमपीएससी, पोलीस व सैन्य भरती यांसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करणारा महत्त्वाचा उपक्रम आहे. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी या व्यासपीठाचा लाभ घेऊन स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणावेत, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी करिअर कट्टा समन्वयक डॉ. किरण गुलदगड, डॉ. अभिमन्यू ढोरमारे, डॉ. वैशाली आहेर, पर्यवेक्षक प्रा. सलीम शेख, डॉ. ब्रम्हानंद दराडे आदी उपस्थित होते.

# तंत्रज्ञानातील बदल स्वीकारून स्वत:ला अद्ययावत करा

### श्री. अमित कोल्हे । सीईटी परीक्षेत ९० ते ९९.९९ पर्सेन्टाईल मिळविणाऱ्या संजीवनीच्या ३७ प्रज्ञावंतांचा सत्कार

**● कोपरगाव । वीरभूमी–**

झपाट्याने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी काळानुसार स्वत:मध्ये सातत्याने बदल घडवून आणत नवे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) कितीही प्रगत झाली तरी तिच्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी आणि योग्य दिशेने वापर करण्यासाठी मानवी ज्ञान, विवेक आणि कौशल्य यांनाच सर्वाधिक महत्त्व आहे. तसेच विद्यार्थ्यांनी करिअरच्या दृष्टीने जगभर कार्यरत असलेल्या संजीवनीच्या माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन घेण्यासाठी अल्युम्नी पोर्टलवर नोंदणी करून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट तथा संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांनी केले.




संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलीत संजीवनी ज्युनिअर कॉलेजच्या ३७ विध्यार्थ्यांनी एमएचटी-सीईटी परीक्षेत ९० ते ९९.९९ पर्सेन्टाईल मिळविले. त्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानवरून श्री अमित कोल्हे बोलत होते. या सोहळ्यास संजीवनी ग्रुप ऑफ स्कूल्सच्या व्यवस्थापकिय संचालिका डॉ. मनाली अमित कोल्हे प्रमुख पाहुण्या म्हणुन उपस्थित होत्या. या परीक्षेत प्रथमेष रवींद्र गोसावी याने ९९. ९९ पर्सेन्टाइल गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला, सिद्धेश प्रशांत क्षत्रिय याने ९९. २० पर्सेन्टाइल गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर शौर्य संतोष थोरात याने ९६. ०८ पर्सेन्टाईल मिळवुन तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला.

श्री. अमित कोल्हे पुढे म्हणाले की संजीवनी ज्यु. कॉलेजमधुन ११ वी बॅच बाहेर पडली असुन सलग १०० टक्के निकालाची परंपरा राखण्यात पालकांच्या सहकार्याबरोबरच शिक्षकांचे कष्ट महत्वपूर्ण आहेत. संजीवनीच्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील तणाव निघुन जात असल्यामुळे विद्यार्थ्यांनी खेळासह विविध स्पर्धामध्ये नेहमी सहभाग नोंदवावा, असा सल्ला दिला.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. मनाली कोल्हे म्हणाल्या की, गुणवंत विद्यार्थ्यांचा हा सत्कार केवळ त्यांच्या गुणांचा नसून त्यांच्या समर्पण, दृढनिश्चय आणि शिस्तबद्ध जीवनशैलीचा गौरव आहे. विध्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांबरोबरच पालकांचे अथक परिश्रम, त्याग आणि अनेक तडजोडी असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या कष्टांची जाणीव कायम ठेवावी. पैसा, पद आणि प्रतिष्ठा ही क्षणभंगुर असते, मात्र ज्ञान ही आयुष्यभर साथ देणारी आणि कधीही न संपणारी संपत्ती आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने चांगले ज्ञानार्जन करून देश आणि समाजासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी डॉ. राजन शेंडगे, डॉ. विपुल पटेल, प्रा. रेखा साळुंके आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## केडगावच्या भैरवनाथ पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

आषाढी वारीनिमित्त केडगाव येथील श्री भैरवनाथ पायी दिंडीचे श्रीक्षेत्र पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. ज्ञानोबा–तुकारामच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. टाळ–मृदंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामस्मरणात शेकडो वारकरी भाविकांनी उत्साहाने दिंडीत सहभाग घेतला. भैरवनाथ पायी दिंडी ही गेल्या ३५ वर्षांची अध्यात्मिक परंपरा जपत वारकरी संप्रदायातील सेवा, श्रद्धा, भक्ती, प्रेम आणि माणुसकीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य करत आहे. ज्येष्ठ नेते, दिंडीचे मार्गदर्शक असलेले भानुदास एकनाथ कोतकर, सुरेखा भानुदास कोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीक्षेत्र पंढरपूरकडे बुधवारी सकाळी दिंडीचे प्रस्थान झाले. यावेळी उदयनराजे संदीप कोतकर यांनी सांगितले की, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत परंपरेने समाजाला भक्ती, सेवा, समता आणि मानवतेचा मार्ग दाखविला आहे. पंढरपूरची वारी ही केवळ यात्रा नसून मन शुद्ध करणारी, समाजात बंधुभाव वाढविणारी आणि प्रत्येकाला अध्यात्माची अनुभूती देणारी पवित्र परंपरा आहे. श्री भैरवनाथ पायी दिंडीचे मार्गदर्शक भानुदास कोतकर, सुरेखा कोतकर, उद्योजक सचिन कोतकर, दिंडी चालक रामदास महाराज क्षीरसागर, मारुती महाराज जने, भागीनाथ बापू कोतकर, ईश्वर महाराज नवसुपे, भागवत महाराज सातपुते, भिमराज महाराज सातपुते यांच्यासह वारकरी बांधव, ग्रामस्थ, युवक आणि विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री भैरवनाथ पायी दिंडीचे मार्गदर्शक भानुदास कोतकर यांच्या मार्गदर्शनाने माजी महापौर संदीप कोतकर यांच्या संकल्पनेतून सुभाश्री फाऊंडेशनच्यावतीने दिंडीतील वारकऱ्यांच्या सोयी सुविधांसाठी आणि महिलांसाठी फिरते शौचालय भेट देण्यात आले. दिंडीतील वारकऱ्यांची गैरसोय होत असल्याचे लक्षात घेऊन वारकऱ्यांना सुविधा मिळाव्यात, या हेतूने सुमारे दहा लाख रुपयांचे दहा फिरते शौचालय भेट देण्यात आल्याची माहिती सुभाश्री फाऊंडेशनचे अध्यक्ष उदयनराजे संदीप कोतकर यांनी दिली. यावेळी आदित्ययनराजे कोतकर उपस्थित होते.

## फिनिक्स फाऊंडेशनने हजारो वारकऱ्यांना पुरवली आरोग्यसेवा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

आषाढी वारीसाठी पंढरपूरला निघालेल्या वारकऱ्यांची दिंडी सुखकर होण्यासाठी फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने आरोग्य सेवा पुरविण्यात आली. शहरातून मार्गक्रमण झालेल्या विविध दिंडीतील हजारो वारकऱ्यांची तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीमध्ये नेत्र व आरोग्य तपासणी करुन त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले. तर दिंडीत मरणोत्तर नेत्रदान व अवयवदानची जागृती करण्यात आली. गेल्या २४ वर्षापासून फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे हा उपक्रम राबवत असून, दरवर्षी संत निवृत्तीनाथ महाराज (नाशिक), मुक्ताई महाराज (जळगाव), जंगले शास्त्री महाराज (डोंगरगण) आदी लहान–मोठ्या दिंडीतील वारकऱ्यांना आरोग्य सुविधा पुरविण्याचे कार्य सातत्याने सुरु आहे. ज्या वारकऱ्यांना औषधोपचाराची गरज भासली त्यांना मोफत औषधोपचार देखील करण्यात आले. या उपक्रमासाठी फिनिक्स सोशल फाऊंडेशनला महंत ह.भ.प. भास्करगिरी महाराज, ह.भ.प. जंगले शास्त्री महाराज यांचे मार्गदर्शन लाभत आहे. आरोग्य सेवेसाठी डॉ. एस.जे. खन्ना, इंजि. अनिल साळुंके, केमिस्ट असोसिएशनचे संचालक सागर फुलसौंदर, रोटरीचे ड. हेमंत कराळे, वैभव दानवे, गौरव बोरुडे, सौरभ बोरुडे, कृष्णा फुलसौंदर आदींनी योगदान दिले.

# गांजीभोयरे ग्रामस्थांच्या सतर्कतेने संभाव्य दरोड्याचा डाव उधळला

**दोघांना ग्रामस्थांनी पकडले । तिघे लोखंडी रॉडचा धाक दाखवत पसार । बीएनएसअंतर्गत गुन्हा दाखल**

**● पारनेर । वीरभूमी –**

गांजीभोयरे येथील ग्रामस्थांच्या प्रसंगावधान, धाडस आणि एकजुटीमुळे संभाव्य दरोड्याचा मोठा डाव उधळण्यात यश आले. मध्यरात्री गावात संशयास्पद हालचाली दिसताच ग्रामस्थांनी डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली. पोलिसांच्या मदतीने सुरू केलेल्या शोधमोहीमेदरम्यान पहाटे पुन्हा संशयित दिसल्यानंतर ग्रामस्थांनी त्यांना घेरले. यावेळी तिघे जण लोखंडी रॉडचा धाक दाखवत मोटारसायकलवरून पसार झाले, तर दोघांना पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.





निघोज पोलीस दूरक्षेत्रातील डायल ११२ पथकावरील पोलीस कर्मचारी सचिन आनंदा जावळे यांना बुधवारी (१५ जुलै) पहाटे सुमारे २ वाजता सतीश आनंदा झंझाड यांनी गावात चोर शिरल्याची माहिती दिली. त्यानंतर जावळे व होमगार्ड विकास बाराहाते यांनी घटनास्थळी धाव घेत ग्रामस्थांसह शोधमोहीम राबविली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस उपनिरीक्षक चांगदेव हंडाळ, पोहेकॉ. लोंढे व चालक पोलीस कर्मचारी मोकाटे यांनाही पाचारण करण्यात आले.

पहाटे साडेचारच्या सुमारास रावसाहेब झंझाड यांच्या घराजवळ पाच संशयित दोन मोटारसायकलींसह उभे असल्याची माहिती मिळताच ग्रामस्थ तेथे दाखल झाले. संशयितांना जाब विचारताच तिघांनी लोखंडी रॉडचा धाक दाखवत एका मोटारसायकलवरून पलायन केले. मात्र, उर्वरित दोघांना ग्रामस्थांनी धाडसाने पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.

चौकशीत त्यांनी आपली नावे अजय संभाजी चव्हाण (वय २४) व सचिन पोपट शिंदे (दोघेही रा. काष्टी, ता. श्रीगोंदा) अशी सांगितली. त्यांच्या ताब्यातील एमएच–१६ डीआर–२८८७ क्रमांकाची हिरो कंपनीची मोटारसायकल जप्त करण्यात आली. मोटारसायकलला लोखंडी कटावणी अडकविलेली आढळून आल्याने पोलिसांनी पंचनामा करून वाहन व कटावणी जप्त केली.

ग्रामस्थांनी पकडताना झालेल्या झटापटीत दोन्ही संशयित जखमी झाल्याने त्यांच्यावर पारनेर ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना पुढील चौकशीसाठी पारनेर पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

या प्रकरणी पोलीस कर्मचारी सचिन आनंदा जावळे यांच्या फिर्यादीवरून अजय चव्हाण, सचिन शिंदे आणि त्यांच्या तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३१० (४) व ३१० (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पसार झालेल्या तिघांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत असून सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती आणि अन्य पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे.

ग्रामस्थांनी दाखविलेल्या सतर्कतेमुळे आणि पोलिसांशी केलेल्या तत्पर समन्वयामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

## ७५ व्या पन्हाळा-पावनखिंड मोहिमेत शिवदुर्ग ट्रेकर्सकडून पावनखिंड वीरांना अभिवादन




**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या वतीने संस्थेच्या कार्यालयात पावनखिंड रणसंग्रामाला ३६६ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने वीर शिवा काशीद, बाजी प्रभू देशपांडे, रायाजी बांदल तसेच स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या ३०० बांदल वीरांना आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी उपस्थितांनी पन्हाळगडाच्या वेढ्यातून छत्रपती शिवाजी महाराजांची सुटका आणि १२ व १३ जुलै १६६० रोजी घोडखिंडीत (आताची पावनखिंड) झालेल्या ऐतिहासिक रणसंग्रामाच्या स्मृतींना उजाळा दिला. स्वराज्यासाठी बांदल सैन्याने दिलेले बलिदान भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे मावळे गेल्या पाच वर्षांपासून हिल रायडर्स फाऊंडेशन, कोल्हापूर यांच्या सहकार्याने पन्हाळा ते पावनखिंड या ५२ किलोमीटरच्या ऐतिहासिक पदभ्रमंती मोहिमेत सहभागी होत आहेत.

यंदा १८ व १९ जुलै रोजी होणाऱ्या ७५ व्या राज्यस्तरीय पन्हाळा–पावनखिंड मोहिमेत पावनखिंड येथे शूर वीरांना अभिवादन करण्यात येणार असून, श्रीगोंदा, दौंड आणि बारामती परिसरातील शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे सुमारे १०० सदस्य या मोहिमेत सहभागी होणार आहेत.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष राजेश इंगळे, मारुती वागस्कर, सागर शिंदे, अक्षय ओहळ, ईश्वर कोठारे आणि आविष्कार इंगळे उपस्थित होते.

## कोपरगावात राष्ट्रीय सामाईक प्रवास कार्ड नोंदणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नागरिकांना विविध प्रवास सवलतींचा लाभ घेण्याचे आवाहन**

**● कोपरगाव । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध प्रवास सवलत योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने राष्ट्रीय सामाईक प्रवास कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.हे शिबिर आ.विवेकभैय्या कोल्हे यांच्या जनसंपर्क कार्यालयात, गुरुद्वारारोड, कोपरगाव येथे दररोज सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सुरू राहणार असल्याची माहिती आ.विवेकभैय्या कोल्हे जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे. या उपक्रमाला उदंड प्रतिसाद नागरिकांचा मिळतो आहे.



राष्ट्रीय सामाईक प्रवास कार्डद्वारे राज्य परिवहन महामंडळाच्या बस, मेट्रो तसेच इतर सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी एकाच कार्डाचा वापर करता येणार असून, शासनाच्या विविध प्रवास सवलत योजनांचा लाभही मिळणार आहे. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना शंभर टक्के मोफत प्रवास, ६५ ते ७५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत, सर्व वयोगटातील महिलांना महिला सन्मान योजनेअंतर्गत ५० टक्के प्रवास सवलत, बारावीपर्यंतच्या विद्यार्थिनींना मोफत प्रवास पास, विद्यार्थ्यांना तसेच दिव्यांग आणि सैनिकांना शासनाच्या नियमानुसार प्रवास सवलती उपलब्ध आहेत.

शिबिरासाठी आधार कार्ड व त्यास जोडलेला मोबाईल क्रमांक सोबत आणणे आवश्यक असून, दिव्यांग लाभार्थ्यांनी विशिष्ट दिव्यांग ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच कार्डमध्ये किमान १०० रुपये शिल्लक ठेवणे बंधनकारक आहे.पात्र लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेऊन राष्ट्रीय सामाईक प्रवास कार्ड तयार करून शासनाच्या विविध प्रवास सवलत योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# गर्दीचा मळा फुलला! : संत शेख महंमद महाराजांची पालखी पंढरीच्या वाटेवर

**टाळ-मृदंगाच्या गजरात हजारो वारकऱ्यांचा सहभाग; श्रीगोंदा नगरी झाली भक्तिरसात दंग**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

शांतता, बंधुभाव आणि भक्तीचा संदेश देणारे श्रीक्षेत्र श्रीगोंदा येथील सद्गुरु श्री संत शेख महंमद महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे आज मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पंढरपूरकडे प्रस्थान झाले. टाळ–मृदंगाचा निनाद, हरिनामाचा गजर आणि विठ्ठलनामाच्या जयघोषात हजारो वारकरी, दिंडीकरी, महिला–पुरुष भाविक आणि नागरिकांच्या उपस्थितीने संपूर्ण श्रीगोंदा नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली.

पालखी प्रस्थानापूर्वी श्री संत शेख महंमद महाराज मंदिरात धार्मिक विधी व पूजा–अर्चा पार पडली. त्यानंतर पालखी रथाचे सारथ्य माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप आणि श्री संत शेख महंमद महाराज प्रतिष्ठान यात्रा कमिटीचे अध्यक्ष गोपाळराव मोटे पाटील यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली पालखी रथ भक्तांच्या जयघोषात पंढरीच्या दिशेने मार्गस्थ झाला.

यंदाच्या पालखी सोहळ्याचे चौथे वर्ष असून, तब्बल तीन हजारांहून अधिक वारकरी आणि भाविक या पायी दिंडीत सहभागी झाले आहेत. संत परंपरेचा वारसा जपत निघालेल्या या सोहळ्यात सामाजिक सलोखा, एकोपा आणि भक्तीचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

पालखी मार्गावर महिलांनी घरोघरी दारासमोर सडा, रांगोळी काढल्या होत्या. पंचांचा वाडा, शिक्षक बँक, सुतार गल्ली, दिल्ली वेस, झेंडा चौक, बसस्थानक, भैरवनाथ मंदिर, काळकाई चौक, छत्रपती शिवाजी चौक, शनी चौक, जोधपूर मारुती चौक, बालाजी मंदिर, श्रीराम मंदिर (बाजारतळ), सिद्धार्थनगर आणि ससाणेनगर आदी ठिकाणी भाविकांनी फुलांची उधळण करत पालखीचे उत्स्फूर्त स्वागत केले.

बाजारतळ येथील श्रीराम मंदिर परिसरात भव्य रिंगण सोहळा पार पडला. हजारो वारकरी या सोहळ्यात सहभागी झाले. हरिनामाच्या गजरात आणि विठ्ठल भक्तीच्या उत्साहात वारकऱ्यांनी भक्तीचा अनोखा अनुभव घेतला. या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यात रथ ओढणारी प्रसिद्ध बैलजोडी यंदा संत शेख महंमद महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी झाली आहे. या बैलजोडीचे मानकरी म्हणून कृषी अधिकारी संदीप बोदगे यांना सलग चौथ्या वर्षी मान मिळाला आहे.

श्रीगोंदा येथून निघालेली पालखी शेडगाव, खेड, भिगवण, पळसदेव, इंदापूर, बावडा, खंडाळी, तोंडले मार्गे पंढरपूर येथे पोहोचणार आहे. प्रवासादरम्यान वारकऱ्यांच्या निवासासाठी मंगल कार्यालयांची व्यवस्था करण्यात आली असून, पिण्याचे शुद्ध पाणी, अल्पोपहार आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



पंढरपूर येथे पोहोचल्यानंतर संत शेख महंमद महाराजांच्या पादुकांची संत ज्ञानेश्वर महाराज (माऊली) आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पादुकांसोबत होणारी भेट हा या सोहळ्याचा प्रमुख आध्यात्मिक क्षण ठरणार आहे.

या पालखी सोहळ्यास श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी उपस्थित राहून दर्शन घेतले व वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. 'नागवडे' कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाबासाहेब भोस यांनीही पालखीचे दर्शन घेत संतांच्या चरणी नतमस्तक झाले. ज्येष्ठ नेते घनश्याम शेलार यांनी श्रीगोंदा ते पंढरपूर पायी दिंडीत सहभागी होत वारकऱ्यांसोबत विठ्ठलनामाचा गजर केला.

यावेळी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरपरिषदेतील विविध पक्षांचे नगरसेवक, सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी, तसेच श्री संत शेख महंमद महाराज प्रतिष्ठान यात्रा कमिटीचे पदाधिकारी, सदस्य आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ब्राम्हणी येथील जाधवराव घराण्याच्या बारवेवरील शिलालेख

## भुईंजकर जाधवरावांच्या इतिहासाला जोडणारा अठराव्या शतकातील महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पुरावा

■ विजय उंडे

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील मौजे ब्राम्हणी येथे जाधवराव घराण्याच्या इतिहासाची साक्ष देणारा एक महत्त्वपूर्ण शिलालेख आढळून आला आहे. हा शिलालेख राहुरी–शनी शिंगणापूर रस्त्यालगत असलेल्या ब्राम्हणी गावातील आकाश जाधवराव पाटील यांच्या जागेत असलेल्या चौरसाकृती दगडात बांधलेल्या नंदा प्रकारच्या बारवेवर कोरलेला आहे.

बारवेच्या मुख्य कमानीच्या अग्रभागी असलेला हा शिलालेख साधारण तीन फूट बाय दोन फूट आकाराच्या चौकोनी शिळेवर उठाव स्वरूपात कोरलेला आहे. शिलालेख सात ओळींचा असून तो मराठी भाषेत देवनागरी लिपीमध्ये आहे. काळाच्या ओघात वातावरणाचा परिणाम झाल्याने काही अक्षरे झिजलेली व पुसट झालेली असली तरी थोड्या प्रयत्नाने लेख स्पष्टपणे वाचता येतो.

### शिलालेखाचे वाचन

१ ।। श्री बल्लाळास्यदेव्य नमः ।।२ ।। स्वस्ति श्रीनूप शालिवाहन शके १७१४३ ।। परिधावी नाम संवत्सरे अस्विन श्रुध ११ वापी च४ ।। कार श्री मार्तंड चरणी दृढ भाव गोविंदराव सुत५ ।। खंडोजी जाधवराव पाटील मोकदम मोजे बा६ ।। मणी ता राहुरी प्रो सगमनेर सन १२०२ श्रुध भाव७ ।। तु । वापीस द्रव्य संख्या सोळासे येक १६०१ ।।

**शिलालेखाचा अर्थ :** शालिवाहन शक १७१४, परिधावी नाम संवत्सर, आश्विन शुद्ध एकादशी म्हणजेच २६ सप्टेंबर १७९२ बुधवार या दिवशी, संगमनेर परगण्यातील राहुरी तालुक्यातील मौजे ब्राम्हणी येथील गोविंदराव जाधवराव यांचा पुत्र खंडोजी जाधवराव, जो त्या गावचा पाटील व मोकदम होता, त्याने आपल्या कुलदैवत श्री बल्लाळास्यदेवी आणि श्री मार्तंड यांच्या चरणी दृढ भक्तिभाव ठेवून या गावात एक वापी (बारव) बांधली अथवा तिचा जीर्णोद्धार केला.

या बारवेच्या बांधकामासाठी किंवा दुरुस्तीसाठी एकूण १६०१ रुपये खर्च झाल्याची नोंद या शिलालेखात करण्यात आली आहे.

### जाधवराव घराण्याच्या इतिहासाचा महत्त्वपूर्ण दुवा

ब्राम्हणी येथील हा बारव शिलालेख केवळ एका जलस्रोताच्या निर्मितीची नोंद नसून, सातारा जिल्ह्यातील भुईंजकर जाधवराव घराण्याच्या इतिहासाला जोडणारा अत्यंत महत्त्वपूर्ण शिलालेखीय पुरावा आहे.

शिलालेखातील व्यक्तिनामे, पदनामे आणि भौगोलिक उल्लेख यांच्या आधारे जाधवराव घराण्याच्या एका शाखेचा विस्तार, त्यांचे वतनसंबंध आणि समाजोपयोगी कार्य यांचा मागोवा घेता येतो.

भुईंजकर जाधवराव हे राजे लखुजीराव जाधवराव यांचे ज्येष्ठ पुत्र दत्ताजीराजे जाधवराव यांच्या वंशातील शाखेतील आहेत. पुढे लखमोजीराजे प्रथम यांच्या वंशातून भुईंजकर जाधवराव ही शाखा प्रसिद्ध झाली.

लखमोजीराजे द्वितीय यांचे पुत्र रायाजीराव जाधवराव यांच्या शाखेतील मानाजी जाधवराव राहुरी येथे स्थायिक झाल्याचा उल्लेख वंशावळींमध्ये आढळतो. मात्र या परंपरेला पुष्टी देणारा शिलालेखीय पुरावा यापूर्वी उपलब्ध नव्हता.

ब्राम्हणी येथील या शिलालेखामुळे या ऐतिहासिक परंपरेला प्रथमच ठोस आधार प्राप्त होतो. शिलालेखातील गोविंदराव सुत खंडोजी जाधवराव पाटील मोकदम मौजे ब्राम्हणी या उल्लेखावरून गोविंदराव आणि खंडोजी जाधवराव हे राहुरी येथे स्थायिक झालेल्या भुईंजकर जाधवरावांच्या रायाजी शाखेतील असावेत, असा तर्क वंशावळी आणि उपलब्ध ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे मांडता येतो.

त्यामुळे हा शिलालेख जाधवराव घराण्याच्या स्थलांतराचा, वतनव्यवस्थेतील भूमिकेचा आणि स्थानिक प्रशासनातील सहभागाचा महत्त्वपूर्ण पुरावा ठरतो.

### जलव्यवस्थापन आणि लोककल्याणाची साक्ष

शिलालेखातील मौजे ब्राम्हणी, ता. राहुरी, प्रांत संगमनेर हा उल्लेख





विशेष महत्त्वाचा आहे. यावरून भुईंज (सातारा) येथील जाधवराव घराण्याची एक शाखा राहुरी परिसरात वतनदार म्हणून कार्यरत होती, हे स्पष्ट होते.

गोविंदराव खंडोजी जाधवराव यांनी गावातील पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करण्यासाठी १६०१ रुपये इतका मोठा खर्च करून ही बारव बांधली. अठराव्या शतकातील आर्थिक परिस्थितीचा विचार करता ही रक्कम अत्यंत मोठी मानावी लागते.

ही बारव केवळ स्थापत्यकृती नव्हती, तर लोककल्याणाच्या भावनेतून उभारलेला सार्वजनिक जलस्रोत होता. त्या काळात गावासाठी पाण्याची शाश्वत व्यवस्था करणे हे सर्वोच्च पुण्यकर्म मानले जात असे.

### धार्मिक श्रद्धा आणि समाजसेवेचा संगम

शिलालेखाच्या प्रारंभी आलेला श्री बल्लाळास्यदेव्यै नमः तसेच श्री मार्तंड चरणी दृढ भाव हा उल्लेख जाधवराव घराण्याची कुलदैवतावरील श्रद्धा आणि धार्मिक निष्ठा दर्शवितो.

धार्मिक प्रेरणेतून समाजोपयोगी कार्य करण्याची परंपरा या शिलालेखातून स्पष्टपणे दिसून येते. गोविंदराव आणि खंडोजी जाधवराव हे केवळ वतनदार व प्रशासकीय अधिकारी नव्हते, तर लोकहिताला प्राधान्य देणारे समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व होते.

### ऐतिहासिक महत्त्व

ब्राम्हणी येथील जाधवराव घराण्याच्या बारवेवरील हा शिलालेख जलव्यवस्थापन, सार्वजनिक दानपरंपरा, ग्रामीण समाजजीवन आणि अठराव्या शतकातील प्रशासन व्यवस्था यांचा अभ्यास करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा स्रोत आहे.

हा शिलालेख भुईंजकर जाधवराव घराण्याच्या रायाजी शाखेचा राहुरी परिसराशी असलेला संबंध सिद्ध करणारा आणि त्यांच्या सामाजिक, धार्मिक व लोकहितवादी कार्याची साक्ष देणारा ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून विशेष महत्त्व प्राप्त करतो.

या शिलालेखाचे संशोधन, माहिती, संकलन व वाचन पुणे येथील अनिल किसन दुधाणे यांनी तर त्यांना आकाश जाधवराव यांनी विशेष सहकार्य केले आहे.

# कर्मयोगी आबासाहेब काकडे जयंती पंधरवडाची सांगता

**चापडगाव विद्यालयात १०७ जांभळीची झाडे लावण्याचा संकल्प । विविध स्पर्धांतील विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण**



● **शेवगाव । वीरभूमी–** तालुक्यातील चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ व्या जयंती पंधरवड्याचा सांगता समारंभ तसेच गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण कार्यक्रम उत्साहात झाला. यावेळी कवी-साहित्यिक डॉ. गवजी बळीद अध्यक्षस्थानी होते.

यावेळी प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्याध्यापक सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, त्रिंबक काटे, अण्णासाहेब गोरे, सत्तारभाई शेख, शंकरराव जाधव, अंकुशराव कातकडे, शितलकुमार गोरे, दादासाहेब ज्योतीक आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. बळीद म्हणाले, शाळेत सर्व ज्ञान उपलब्ध असते, मात्र ते आत्मसात करणारा विद्यार्थी पारंगत असावा. कर्मयोगी आबासाहेब काकडे यांनी शिक्षणाची गंगा तळागाळापर्यंत पोहोचवली. त्यांच्या वसतिगृहांमुळे माझ्यासारख्या हजारो गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली.

प्राचार्य संपत दसपुते यांनी कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त विद्यालय परिसरात १०७ जांभळीची झाडे लावण्याचा संकल्प जाहीर केला. याची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते पाच रोपांचे वृक्षारोपण करून करण्यात आली.

ज्येष्ठ शिक्षक प्रभाकर मराठे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यालयात आयोजित वाचन, वक्तृत्व, मेहंदी, चित्रकला व सुंदर हस्ताक्षर स्पर्धांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वत्सला जाधव, अनुमोदन अशोक आघवणे, सूत्रसंचालन सर्जेराव निकाळजे, तर आभार अक्षय पुरनाळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# शाळकरी मुलीचा पाठलाग करून विनयभंग; पारनेरात दोन रोडरोमिओंवर पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल

● **पारनेर । वीरभूमी–** पारनेर शहरातील शाळेतून घरी जाणाऱ्या एका १५ वर्षीय विद्यार्थिनीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एवढ्यावरच न थांबता, या प्रकाराबाबत जाब विचारण्यासाठी गेलेल्या पीडित विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांनाही आरोपींनी शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पीडित विद्यार्थिनीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून पारनेर पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित विद्यार्थिनी पारनेर शहरातील एका शाळेत शिक्षण घेत असून ती मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे एसटी बसने शाळेत आली होती. दुपारी शाळा सुटल्यानंतर सायंकाळी चारच्या सुमारास ती गावाकडे जाण्यासाठी पारनेर एसटी स्थानकाच्या दिशेने पायी निघाली होती. शाळेच्या प्रवेशद्वारासमोर ती आली असता, गौरव भाऊसाहेब साळूंखे (रा. मटन मार्केट, पारनेर) व विकास विलास सोनवणे (रा. रांधे, ता. पारनेर) यांनी तिचा पाठलाग सुरू केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पाठलाग करत आरोपी विद्यार्थिनीच्या अगदी जवळ आले. तुझा मोबाईल नंबर मला दे, तू मला आवडते आहेस, असे म्हणत त्यांनी तिची छेड काढली व तिचा विनयभंग केल्याचा आरोप आहे. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे घाबरलेल्या विद्यार्थिनीने कसाबसा तेथून निघून घरी जाऊन घडलेला सर्व प्रकार आपल्या पालकांना सांगितला. मुलीकडून घटना समजल्यानंतर तिचे वडील व इतर नातेवाईक आरोपींना जाब विचारण्यासाठी गेले. मात्र, चूक मान्य करण्याऐवजी आरोपींनी त्यांच्याशी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. तसेच तुम्हाला जीवे मारून टाकू, अशी धमकी देत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० अनुषंगाने

# टी.वाय. बी.एस्सी. (भौतिकशास्त्र) अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळा उत्साहात

● **कोपरगाव । वीरभूमी–** रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स महाविद्यालय, कोपरगाव येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अभ्यास मंडळ, महाविद्यालयाचा भौतिकशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अनुषंगाने टी.वाय.बी.एस्सी. (भौतिकशास्त्र) अभ्यासक्रम पुनर्रचनेवरील एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. उद्घाटन सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून भौतिकशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. पंडित शेळके उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष ॲड. संदीप वर्पे होते.

कार्यशाळेच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी प्रास्ताविक व स्वागत करताना बदलत्या काळानुसार उच्च शिक्षणात आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, प्रकल्पाधारित अध्ययन, कौशल्याधारित शिक्षण आणि रोजगाराभिमुख घटकांचा अभ्यासक्रमात समावेश करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. सहभागी प्राध्यापकांच्या सूचना आणि अनुभवांमुळे अभ्यासक्रम अधिक परिणामकारक, विद्यार्थीकेंद्री आणि गुणवत्तापूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. पंडित शेळके यांनी, नवीन अभ्यासक्रमात कौशल्यविकास, संशोधन, प्रात्यक्षिके, प्रकल्पाधारित अध्ययन, नवोपक्रम आणि रोजगारक्षमतेवर विशेष भर देण्यात आल्याचे सांगितले. कार्यशाळेत सहभागी प्राध्यापकांकडून प्राप्त सूचनांचा विचार करून अंतिम अभ्यासक्रम निश्चित करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना ॲड. संदीप वर्पे यांनी, विद्यार्थीकेंद्री, गुणवत्तापूर्ण आणि काळाच्या गरजांशी सुसंगत शिक्षणासाठी अशा कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे प्रभावीपणे साध्य करण्यासाठी अभ्यासक्रम सातत्याने अद्ययावत राहणे आवश्यक आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

तांत्रिक सत्रात प्राचार्य डॉ. काकासाहेब मोहिते यांनी, जनरल फिजिक्स हा भौतिकशास्त्राचा मूलभूत पाया असून बदलत्या शैक्षणिक गरजा, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून त्याचा अभ्यासक्रम अधिक संकल्पनाधारित, प्रयोगशील, संशोधनाभिमुख व कौशल्याधारित करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन केले. त्यानंतर डॉ. रमेश भिसे आणि डॉ. शिवाजी भोसले यांनी, टी.वाय. बी.एस्सी. (भौतिकशास्त्र) अभ्यासक्रमाची रचना, उद्दिष्टे, श्रेयांक, मूल्यमापन पद्धती तसेच अध्यापनातील अपेक्षित बदलांचे सविस्तर विवेचन केले.. डॉ. रामनाथ पवार आणि डॉ. अनिल गर्जे यांनी नवीन अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन केले. त्यानंतर झालेल्या मुक्त चर्चासत्रात सहभागी प्राध्यापकांनी अभ्यासक्रमातील विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा करून उपयुक्त सूचना मांडल्या. या सूचनांच्या आधारे अभ्यासक्रम अधिक दर्जेदार, परिणामकारक आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक गरजांशी सुसंगत करण्यावर भर देण्यात आला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या उद्दिष्टांनुसार तयार होणारा अभ्यासक्रम सहभागी प्राध्यापकांच्या सूचना व अनुभवांमुळे अधिक गुणवत्तापूर्ण, परिणामकारक आणि विद्यार्थीकेंद्रित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



कार्यशाळेस पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील प्राचार्य, विभागप्रमुख, भौतिकशास्त्र विषयाचे प्राध्यापक तसेच अभ्यास मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती पाटील व प्रा. पी. बी. जामदार यांनी केले, तर आभार प्रा. ए. आर. कदम यांनी मानले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी उपप्राचार्य डॉ. बंडेराव तऱ्हाळ, डॉ. अर्जुन भागवत, डॉ. घनश्याम भगत, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. निलेश मालपुरे, भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. मोहनसिंग पाडवी, प्रा. एस. एस. अदोणे, प्रा. ए. आर. कदम, सौ. एफ. एस. मुलाणी, सौ. बी. के. पाचपिंड तसेच कार्यालय अधीक्षक श्री. सुनील गोसावी यांचे विशेष सहकार्य लाभले.